राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/उपस्थिती/२०२१/6483 .  दिनांक : 13 OCT 2021

प्रति,

पुणे महानगरपालिका क्षेत्रामधील
प्राचार्य / संचालक / उपसचिव,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / कार्यालय.

**विषय : कोरोना विषाणू (कोविड १९) संसर्ग साखळी रोखण्यासाठी " Breaking the Chain " सुधारित मार्गदर्शक सूचना.**

संदर्भ : मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे आदेश क्रमांक मआ/साप्रवि/६०४८, दिनांक ०८/१०/२०२१.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने राज्यातील कोविड १९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरिता प्रसारणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी लावलेले निर्बंध जिल्हानिहाय / प्रशासकीय युनिटनिहाय शिथिल करणे, तसेच विविध आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबद्ध सुरु करण्याच्या अनुषंगाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत.

तसेच पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड १९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी उपरोक्त संदर्भानुसार सुधारित आदेश निर्गमित करण्यात आलेले असून सदर आदेशातील मुदा क्रमांक (५) नुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रातील **सर्व शासकीय तसेच खाजगी कार्यालये येथील उपस्थिती १०० टक्के क्षमतेने** करण्यात आलेली आहे. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे **दोन मात्रा (डोस) पूर्ण** झालेले असणे अनिवार्य राहील. (सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

**सदर आदेश हे दिनांक ०८/१०/२०२१ पासून पुढील आदेश देईपर्यंत पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू राहतील.**

तसेच संस्थेत / कार्यालयात कोविड १९ साथरोगाचा प्रसार रोखण्याचे दृष्टीने सोशल डिस्टंसिंग, फेस मास्क परिधान करणे, सॅनिटायझेशन इत्यादीबाबत मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

E:\my documents\Office Timing.docx\68